# FOTO CIRCLE SOCIETY



YEAR 2010-2011

Copyrights Reserved

www.fotocirclesociety.com

‘फोटो सर्कल सोसायटी’ १९९८ साली ठाणे शहरातील धडपड्या व उत्साही छायाचित्रकारांनी एकत्र येऊन स्थापन केलेली छायाचित्रकारांची संस्था!

‘Together We Progress’ या संस्थेच्या ब्रीद वाक्याला स्मरुन ग्रामीण भागाचा समावेश जास्त असलेल्या ठाणे जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण छायाचित्रकारांना कधी त्यांच्या कलाविष्कारासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, कधी मान्यवर अनुभवी छायाचित्रकारांच्या कार्यशाळेच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे, नामवंतांच्या स्लाईड शो, लघुपटाचे आयोजन करणे तर कधी छायाचित्रकारांच्या वैयक्तिक अडचणींना सहकारी म्हणून मदतीचा हात देणे, तर दरवर्षी ठाणे महानगरपालिकेच्या सहकार्याने नवोदित व हौशी व्यावसायिक छायाचित्रकारांसाठी सतत ९ वर्षे स्पर्धा व प्रदर्शन आयोजित करणे ही संस्थेच्या कार्याची थोडक्यात व्याप्ती!

गेल्या दहा वर्षात राबविलेल्या विविध उपक्रमांमधून ज्येष्ठ छायाचित्रकार श्री. अधिक शिरोडकर, श्री. गोपाळ बोधे, श्री. उद्धव ठाकरे, श्री. शाम मंचेकर, श्री. हेमंत कोठारी, श्री. मोहन वाघ, श्री. काकुभाई, श्री. मोहन बने, श्री. सुधारक ओलवे, श्री. निर्भय पाटील, श्री. हिरा पंजाबी, श्री. वासुदेव निब्रे, श्री. बिपीन मिस्त्री, श्री. जगदिश अग्रवाल या आणि अशा अनेक मान्यवर छायाचित्रकारांचे मौलिक मार्गदर्शन जिल्ह्यातील छायाचित्रकारांना लाभले. विविध समारंभांचे छायाचित्रण तसेच औद्योगिक, वृत्तपत्र, फॅशन, वन्यजीव अशा विविध स्तरातील छायाचित्रकारांपर्यंत ‘जिल्ह्यात सर्वदूर फोटो सर्कल सोसायटीच्या माध्यमातून मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात आली.

केवळ छायाचित्रकारांच्या उन्नतीसाठी कार्यरत असणारी फोटो सर्कल ही एकमेव संस्था आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सन २००० साली ठाणे शहराला भूषणावह अशा ‘सुंदर शहर’ या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्याच्या नामांकनासाठी फोटो सर्कल सोसायटीच्या अनेक छायाचित्रकारांनी आपल्या छायाचित्रांच्या रुपाने योगदान दिले आहे.

१९ ऑगस्ट हा जागतिक छायाचित्रकार दिन फोटो सर्कलतर्फे आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. फोटो सर्कल सोसायटीच्या विविध उपक्रमांना जिल्ह्यातून मिळणाऱ्या उदंड प्रतिसादामुळे यंदाच्या स्थापनेच्या दशकपूर्ती निमित्त महाराष्ट्रातील सर्व छायाचित्रकारांपर्यंत पोहोचण्याचा संस्थेचा मानस आहे, म्हणून आजवर केवळ ठाणे जिल्ह्यापर्यंत मर्यादित असणारी स्पर्धा व प्रदर्शन यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रातील छायाचित्रकारांसाठी आयोजित करण्यात येणार आहे. आपल्या सारख्या हितचिंतकांच्या पाठिंब्यावर हा थोडा धाडसी व महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेत आहोत. तो यशस्वी करण्याकरिता आपला सक्रिय सहभाग लाभेल या विश्वासाला आपण भरभरुन प्रतिसाद द्याल अशी अपेक्षा आहे.